# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२८/०५/१८
## दि.२८/०५/१८ रोजी दु.१२/०० वा.ते २०/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे २५९/१८,भादविक ३०७,३२६,३२३,५०४,५०६,१४३,१४७,१४८,१४९,महा.पो.का. क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | अक्षय केंगले, वय १८ वर्षे,रा.पिंपळे गुरव,पुणे |
| **आरोपी** | १)अक्षय खुडे, २) उऱ्या ३) आकाश गाडेकर, ४) दिग्विजय ५) कमलेश ६) रितेष साठे, ७)मोजेस, ८) योगेश आणा, ९) मनिषभाई व इतर ४ ते ५ साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०५/२०१८ रोजी रात्रौ २१/०० वा.चे सुमारास दिव्या ड्रायफ्रुटस व फरसाना दुकानासमोर नेताजी नगर, गल्ली नं.१, पिंपळे गुरव, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व त्यांचा मित्र गणेश मोटे हे पायी रस्ता क्रॉस करत असताना, यातील नमुद इसमांनी मोटार सायकलवरुन येवुन, अ.क्र. ८ व ९ यांनी फिर्यादी व मित्र गणेश मोटे याचा काटा काढायला सांगितले आहे असे म्हणुन फिर्यादी व त्यांचा मित्र यांना शिवीगाळ करुन, दमदाटी करुन, लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन, फिर्यादी व त्यांचा मित्रस जिवे मारण्याचे उद्देशाने त्यांचेकडील लोखंडी कोयत्याने वार करुन, गंभीर जखमी करुन, जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सांगवी पो.स्टे.प्रभारी अधिकारी २७२८६१६२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ६३६/१८,भादविक ३०४(अ),२०१,३४,मोव्हेॲक्ट १३२,११९/१७७ |
| **फिर्यादी** | अंजुम बागवान, पो.निरी.गुन्हे, हडपसर पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | १)जगन्नाथ बापुराव वाघमारे,वय ३० वर्षे,रा.न्यु इंग्लिश स्कुलच्या शेजारी,फुरसुंगी,पुणे २)सागर जालिंदर दिघे, वय २८ वर्षे,रा.सोनारपुल रोड,न्यु तिरंगा हॉटेल शेजारी फुरसुंगी ता.हवेली,जि.पुणे ३)बालाजी विठ्ठलराव शिंदे, वय ४२ वर्षे,रा.आत्माराम पठारे यांच्या खोलीत सोमनाथ मळा, पठारे वस्ती, खराडी,पुणे मुळ रा.नांदेड (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०३/२०१८ रोजी दुपारी १४/३० वा.चे सुमारास ग्रीन हाईव्ह कन्स्ट्रक्शन साईटवरील लेबर कॅम्प जवळ, फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, साईटवरील लेबर कॅम्पजवळ, चालु असलेले जेसीबीचे खोदकामामध्ये जेसीबीच्या मागील चालकाखाली मजुर नामे-धर्माजी गंगाराम गायकवाड, यांची दिड वर्षाची मुलगी-दिपाली ही मयत झाली आहे. यातील जेसीबी चालक जगन्नाथ वाघमोर, याने हयगयीने अविचाराने त्याचे ताब्यातील जेसीबी चालवुन मुलगी नामे-दिपाली धर्माजी गायकवाड, वय दिड वर्षे, हिला गंभीर जखमी करुन, तिचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. तसेच जेसीबीचे मालक सागर दिघे, व सदर साईटचा ठेकेदार बालाजी शिंदे, यांनी अपघाताबाबत पोलीसांना खबर न देता मयत मुलीचे आई वडिलांना सदर मुलीचा मृतदेह परस्पर पुरुन टाकणेस सांगितले आहे. |
| **त.अंमलदार** | हडपसर पो.स्टे.प्रभारी अधिकारी २६९९६५७७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**